महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत कान्हेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**क्र. मु.अ.(वा)/लेखा/ग्रा.पं.दिवाबत्ती/५५/२०१४-१५/** 20010 **दिनांक :** 16 APR 2015

**परिपत्रक क्र.** २१२

**विषय :-** ग्रामपंचायतीना रस्त्यावरील विजेच्या दिव्यांच्या वीज बिलांची रक्कम देण्यासाठी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी अनुदानापोटी मंजुर केलेली रक्कम रु. ७,८२,२४,०००/- (रुपये सात कोटी ब्याऐंशी लक्ष चोवीस हजार फक्त)

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र. बीजीटी-२६०३/प्र.क्र.-१९९२/पंरा-४ दि.२२.०९.२००३.
२) वित्त विभाग परिपत्रक क्र. अर्थसं-२०१४/प्र.क्र.६६/अर्थसंकल्प-३/दि.१७.४.२०१४.
३) शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१४/प्र.क्र.२५/वित्त-२ दि.१७.५.२०१४.
४) क्र. मु.अ.(वा)/लेखा/ग्रा.पं.दिवाबत्ती/५५/२०१४-१५/१९५०४दि.१७.०६.२०१४.
५) शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१४/प्र.क्र.२५/वित्त-२ दि.८.८.२०१४.
६) शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१४/प्र.क्र.२५/वित्त-२ दि.१९.०१.२०१५.
७) शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१४/प्र.क्र.४४/वित्त-२ दि.११.०२.२०१५.
८) शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१४/प्र.क्र.४४/वित्त-२ दि.२५.०२.२०१५.
९) शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१४/प्र.क्र.२५/वित्त-२ दि.२५.०२.२०१५

---

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची विज देयके भागविण्यासाठी शासन ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देते. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम रुपये १५६,४४,८५,०००/- (रुपये एकशे छापन्न कोटी चौवेचाळीस लाख पंच्याऐंशी हजार फक्त) इतकी तरतुद शासकीय अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे, त्यापैकी खालीलप्रमाणे शासन निर्णयानुसार महावितरण कंपनीस रक्कम प्राप्त झालेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१४/प्र.क्र.२५/वित्त-२ दि.१७.५.२०१४ (वाणिज्य परिपत्रक क्र. १९५ दि.१७.०६.२०१४) | रक्कम रु. ५२,१४,९५,०००/- |
| २) | शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१४/प्र.क्र.२५/वित्त-२ दि.८.८.२०१४ (वाणिज्य परिपत्रक क्र. २०० दि.१८.०९.२०१४) | रक्कम रु. ४१,७१,९६,०००/- |
| ३) | शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१४/प्र.क्र.२५/वित्त-२ दि.१९.१.२०१५ (वाणिज्य परिपत्रक क्र. २०७ दि.२३.०२.२०१५) | रक्कम रु.३१,२८,९७,०००/- |
| ४) | शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१४/प्र.क्र.२५/वित्त-२ दि.११.२.२०१५ (वाणिज्य परिपत्रक क्र. २०८ दि.३०.०३.२०१५) | रक्कम रु.५७,६०,००,०००/- |
| ५) | शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१४/प्र.क्र.४४/वित्त-२ दि.२५.२.२०१५ (वाणिज्य परिपत्रक क्र. २१० दि.०४.०४.२०१५) | रक्कम रु. ३,६०,००,०००/- |
| | | **एकूण रु. १८६,३५,८८,०००/-** |

वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अंदाज २०१३/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३ दि.०९.०२.२०१५ च्या परिपत्रकान्वये अर्थसंकल्पीय तरतुदीच्या ८५ % च्या मर्यादेत वितरणास मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी ८० % च्या मर्यादेत रु. १२५,१५,८८,०००/- एवढे अनुदान वितरीत करण्यात आले आहे. आता उर्वरित तरतूदीच्या ५ % च्या मर्यादेत रु. ७,८२,२४,०००/- (अक्षरी रुपये सात कोटी ब्याऐंशी लक्ष चोवीस हजार फक्त) इतके अनुदान अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BDS) उपलब्ध करुन देण्यास व वितरीत करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे.

सदर मंजुर रक्कमेतील रु. ७,८२,२४,०००/- (रुपये सात कोटी ब्याऐंशी लक्ष चौवीस हजार फक्त) इतकी तरतुद वरील संदर्भिय शासन निर्णया सोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे शासनाकडून, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितला रोखीत प्राप्त झालेली आहे.

शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरण पत्रातील रक्कमेचे, संबंधीत जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या नावाने थकबाकीच्या प्रमाणात वर्ग करण्याबाबत संबंधितांनी जरुरती कार्यवाही करावी.

थकबाकी पोटी समायोजित करण्यात आलेल्या रक्कमेचे (सन २०१४-१५) ग्रामपंचायत निहाय विवरण पत्राची एक प्रत संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच विभागीय आयुक्त व उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांच्यासह या कार्यालयास त्वरित पाठवावी.

**सोबत :** वरीलप्रमाणे

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**<u>प्रत सविनय सादर :-</u>**
संचालक (वित्त), म.रा.वि.वि.कं. मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना :-**
१. सर्व मुख्य अभियंते, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, संवसु परिमंडळ कार्यालये, माहिती व उचित कार्यवाहसाठी
२. मुख्य महाव्यवस्थापक (निगम वित्त), म.रा.वि.वि.कं. मर्यादित, मुंबई. माहिती व उचित कार्यवाहसाठी

**प्रत रवाना :**
१. सर्व अधिक्षक अभियंते, संवसु मंडळ कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित
२. महाव्यवस्थापक (अर्थोपाय विभाग), ३ रा मजला, हॉगकाँग इमारत, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
३. सर्व कार्यकारी अभियंते, संवसु विभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित
४. सर्व उपकार्यकारी अभियंते / सहाय्यक अभियंते, संवसु उपविभागीय कार्यालये.
---- उचित कार्यवाहीसाठी.

**अर्थसंकल्पीय अनुदान सन २०१४-२०१५**
**मागणी क्र. एल -५ लेखाशिर्ष ३६०४** - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमादेणे.२००इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकितरकमादेणे- (०१)(०३)रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतींना १०० % अनुदान (३६०४०३२५) (दत्तमत)

**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र. अर्थसं २०१४/प्र.क्र.-२५ /वित्त-२
मंत्रालय, मुंबई — ४०००३२
दिनांक:-२५/२/२०१५

संदर्भ वाचा :- १) शासन निर्णय , ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम २०८५/सीआर १९४०/२२ दि . ३०.१.९०
२)शासन निर्णय क्र. बीजीटी-२६०३/प्र.१९९२/पंरा-४/दि.२२सप्टेंबर,२००३
३) शासन निर्णय क्र. अर्थसं २०१४/प्र.क्र.-२५ /वित्त-२दि.१७/५/२०१४ , दि. ८/८/२०१४व दि. १९/१/२०१५

प्रस्तावना :-

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची वीज देयके भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देण्यात येते. यासाठी सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात **रुपये १५६,४४,८५,०००/- (अक्षरी रुपये एकशे छप्पन कोटी चव्वेचाळीस लक्ष पंच्याऐंशी हजार फक्त** ) इतक्या रकमेची अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची दिवाबत्तीची देयके त्वरित भागविण्यासाठी प्रशासकीय विभागांनी शासकीय अनुदानातून परस्पर सदर रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरणा करावी असा निर्णय शासनाने सन २००३ या वर्षी घेतलेला आहे.

**शासन निर्णय :-**

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची वीज देयके भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान (३६०४०३२५) या लेखाशिर्षाखाली सन २०१४-२०१५या आर्थिक वर्षाकरीता **रु.१५६,४४,८५,०००/- (अक्षरी रुपये एकशे छप्पन कोटी चव्वेचाळीस लक्ष पंच्याऐंशी हजार फक्त** ) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यांत आली आहे.

२. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अंदाज२०१३/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३ दि.९/२/२०१५च्या परिपत्रकान्वये अर्थसंकल्पीय तरतुदीच्या ८५% च्या मर्यादेत वितरणास मान्यता देण्यात आली आहे.त्यापैकी ८०% च्या मर्यादेत रु. १२५,१५,८८,०००/- एवढे अनुदान वितरीत करण्यात आले आहे. आता उर्वरित तरतूदीच्या ५% च्या मर्यादेत **रु.७,८२,२४,०००/-(अक्षरी रुपये सात कोटी ब्याऐंशी लक्ष चोवीस हजार फक्त**)इतके अनुदान अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली वर (BDS) उपलब्ध करून देण्यास व वितरित करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे.सदर तरतूद सोबतच्या विवरणपत्रात जिल्हानिहाय दर्शविलेल्या विगतवारीप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून ती आता या शासन निर्णयाव्दारे कार्यासन अधिकारी, रोखशाखा, ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, यांचे अधिनस्त ठेवण्यात येत आहे. सदरचा निधी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून आहरित करुन वितरित करण्यासाठी त्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी उपरोक्त मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचा धनादेश महाराष्ट्र राज्य, विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांच्या नावाने अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून काढावयाचा आहे. श्री. वि.म. राउत, कार्यासन अधिकारी, रोखशाखा यांच्या सहीने तयार केलेले व श्री. मो. का. भोये, सहसचिव (रोखशाखा ), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले देयक अधिदान व लेखाकार्यालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यात यावे.

४. या करीता **रु.७,८२,२४,०००/-(अक्षरी रुपये सात कोटी ब्याऐंशी लक्ष चोवीस हजार फक्त)** इतक्या अनुदानास मंजूरी देण्यात येत आहे. इतके अनुदान खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

अ) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांना दिलेल्या धनादेशाची रक्कम त्यांनी या शासन निर्णयासोबतच्या विवरण पत्रातील रकाना क्र. ३ मधील रक्कम त्या त्या जिल्हा परिषदांच्या अखत्यारीत असलेल्या ग्रामपंचायतीच्या रस्त्यावरील दिवाबत्तीच्या वीज देयकाच्या थकबाकीस अधीन राहून समायोजित करावी व तसा अहवाल शासनास सादर करावा .

ब) समायोजित केलेल्या रक्कमेबाबतचे स्वतंत्र विवरणपत्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी ठेवणे आवश्यक असून त्याची एक प्रत त्यांनी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पाठवावयाची आहे. तसेच त्याची एक प्रत शासनालाही पाठवावयाची आहे.

क) वरील अटींची पूर्तता होत आहे याची खात्री करुन घेण्यासाठी महालेखापाल, महाराष्ट्र -१ , मुंबई आणि महालेखापाल , महाराष्ट्र -२, नागपूर यांना लेखापरिक्षणाकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांची पुस्तके व लेखा पाहणीचा अधिकार राहील. महालेखापाल यांना त्यांचे काम पार पाडण्याकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी सर्वतोपरी सहकार्य दिले पाहिजे.

ड) खर्चाचा मेळ घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी खर्चाची विवरणपत्रे विभागीय आयुक्तांना पाठवून त्याची एक प्रत शासनास पाठवावी.

विभागीय आयुक्तांनी शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र. आरसीएन१०८९/प्र.क्र.३०२७/२८, दि. ५.९.९० मधील सूचनेप्रमाणे या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापालांकडे नोंदलेल्या खर्चाबरोबर मेळ घालावा व अहवाल शासनाकडे पाठवावा.

५. उपरोक्त निधीबाबत नियंत्रक अधिकारी म्हणून श्री. मो. का. भोये, सहसचिव (रोखशाखा ) ,ग्राम विकास व जलसंधारण विभाग हे राहतील .

६. या शासन निर्णयाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाएवढा खर्च मागणी क्र.एल-५, "३६०४" स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २०० इतर संकीर्ण नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलाची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देणे (३६०४०३२५) (दत्तमत)-५० -इतर खर्च या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

८. हा शासन निर्णय वित्त विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्र.१४२/२०१५/व्यय-१५अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( पां.रा. खोटरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई -४०० ००१ वर नमूद केल्याप्रमाणे तीन प्रतीत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.(३ प्रती )

२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ००१

३) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ००१

४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर .

५) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर

६) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,प्रकाशगड,वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ००५१ (५ प्रती)

७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित प्रकाशगड अनंत काणेकर मार्ग, वांद्रे ( पूर्व ) मुंबई ४०० ०५१.

८) मुख्य अभियंता (वाणिज्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड (वाणिज्य विभाग) ५ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१ (५ प्रती)

९).अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य (अराप/रालेवि-१), मुंबई.

१०) निवासी लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कपंनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.

११) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा , कोकण भवन , वाशी , नवी मुंबई

१२) उप लेखा परिक्षक , नवी मुंबई , वाशी /पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर

१३) मुख्य अभियंता, विद्युत विभाग, महाराष्ट्र शासन, प्रशासकीय इमारत, ५९ रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई ४०० ०७१

१४) अवर सचिव (उर्जा -३) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -३२

१५) विभागीय आयुक्त (सर्व)

१६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

१८) सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

१९) कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारणविभाग (वित्त -१, वित्त- ७, वित्त -८)

२०) कक्ष अधिकारी (रोखशाखा) ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई.३२.

२१) वित्त विभाग (अर्थसंकल्प १७ /व्यय१५)मंत्रालय, मुंबई.३२.

२२) निवडनस्ती ,वित्त-२ ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

(क्र.आ.प.)

## विवरणपत्र

शासन निर्णय क्र अर्थसं २०१४/प्र.क्र.-२५ /वित्त-२, दिनांक २५/२/२१५चे विवरणपत्र

मागणी क्र. एल -५ लेखाशिर्ष ३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २००, इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे- (०१) (०३) रस्त्यांवरील विजेच्या दिव्यांच्या देयकांची रक्कम भरण्यासाठी ग्रामपंचायतीना १००%अनुदान (३६०४०३२५)

(दत्तमत) -५० इतर खर्च.

(रुपये /हजारात)

| अ. क्र. | जिल्हा परिषद | या शासन निर्णयान्वये वितरित करण्यांत येत असलेले अनुदान | |
|---|---|---|---|
| | | | ४ |
| १ | २ | ३ | |
| १ | ठाणे | २०३१ | (रुपये वीस लक्ष एकतीस हजार फक्त ) |
| २ | रायगड | २१६७ | (रुपये एकवीस लक्ष सदुसष्ट हजार फक्त ) |
| ३ | रत्नागिरी | ३३१ | (रुपये तीन लक्ष एकतीस हजार फक्त ) |
| ४ | सिंधूदुर्ग | २७७ | (रुपये दोन लक्ष सत्याहत्तर हजार फक्त ) |
| ५ | नाशिक | ३६०४ | (रुपये छत्तीस लक्ष चार हजार फक्त ) |
| ६ | धुळे | २१५४ | (रुपये एकवीस लक्ष चौपन्न हजार फक्त ) |
| ७ | नंदूरबार | ३०५४ | (रुपये तीस लक्ष चौपन्न हजार फक्त ) |
| ८ | जळगांव | ३३४६ | (रुपये तेहतीस लक्ष शेहेचाळीस हजार फक्त ) |
| ९ | अहमदनगर | ३०६२ | (रुपये तीस लक्ष बासष्ट हजार फक्त ) |
| १० | पुणे | ६७३४ | (रुपये सदुसष्ट लक्ष चौतीस हजार फक्त ) |
| ११ | सातारा | ३४५० | (रुपये चौतीस लक्ष पन्नास हजार फक्त ) |
| १२ | सांगली | १५७९ | (रुपये पंधरा लक्ष एकोणऐंशी हजार फक्त ) |
| १३ | सोलापूर | ५३७८ | रुपये त्रेपन्न लक्ष अठ्ठयाहत्तर हजार फक्त ) |
| १४ | कोल्हापूर | १०६८ | (रुपये दहा लक्ष अडूसष्ट हजार फक्त ) |
| १५ | औरंगाबाद | ४७७४ | (रुपये सत्तेचाळीस लक्ष चौ-याहत्तर हजार फक्त ) |
| १६ | जालना | १२४२ | (रुपये बारा लक्ष बेचाळीस हजार फक्त ) |
| १७ | परभणी | २०८३ | (रुपये वीस लक्ष त्र्याऐंशी हजार फक्त ) |
| १८ | हिंगोली | १५९५ | (रुपये पंधरा लक्ष पंच्याण्णव हजार फक्त ) |
| १९ | बीड | २२२४ | (रुपये बावीस लक्ष चोवीस हजार फक्त ) |
| २० | नांदेड | ५४०३ | (रुपये चौपन्न लक्ष तीन हजार फक्त ) |
| २१ | उस्मानाबाद | १४७४ | (रुपये चौदा लक्ष चौ-याहत्तर हजार फक्त ) |
| २२ | लातूर | २४८३ | (रुपये चोवीस लक्ष त्र्याऐंशी हजार फक्त ) |
| २३ | बुलढाणा | १४३८ | (रुपये चौदा लक्ष अडतीस हजार फक्त ) |
| २४ | अकोला | १४९६ | (रुपये चौदा लक्ष शहाण्णव हजार फक्त ) |
| २५ | वाशिम | ६७७ | (रुपये सहा लक्ष सत्याहत्तर हजार फक्त ) |
| २६ | अमरावती | १३९३ | (रुपये तेरा लक्ष त्र्याण्णव हजार फक्त ) |
| २७ | यवतमाळ | ७४३० | (रुपये चौ-याहत्तर लक्ष तीस हजार फक्त ) |
| २८ | वर्धा | ७८२ | (रुपये सात लक्ष ब्याऐंशी हजार फक्त ) |
| २९ | नागपूर | १३३० | (रुपये तेरा लक्ष तीस हजार फक्त ) |
| ३० | भंडारा | ४५३ | (रुपये चार लक्ष त्रेपन्न हजार फक्त ) |
| ३१ | गोंदिया | ३४६ | (रुपये तीन लक्ष शेहचाळीस हजार फक्त ) |
| ३२ | चंद्रपूर | ९७१ | (रुपये नऊ लक्ष एकाहत्तर हजार फक्त ) |
| ३३ | गडचिरोली | २३९५ | (रुपये तेवीस लक्ष पंचाण्णव हजार फक्त ) |
| | एकूण | ७८२२४ | **(अक्षरी रुपये सात कोटी ब्याऐंशी लक्ष चोवीस हजार फक्त)** |

( पां.रा. खोटरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.